Peer Reviewed

ISSN 2319-8648

Indexed (SJIF)

Impact Factor - 7.139

# Current Global Reviewer

UGC Approved International Refereed Research Journal Registered & Recognized
Higher Education For All Subjects & All Languages

Editor in Chief
Mr.Arun B. Godam

**Current Global Reviewer (Peer Reviewed)** ISSN- 2319-8648
Impact Factor - (SJIF) – 7.139, Special Issue – 131 Aug. 2020

प्रा.डॉ.बाजीराव माणिकराव पाटील

21. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचेशैक्षणिक कार्ये 58
श्री.डॉ.सुदर्शन व्यंकटराव सोनवणे
22. ''साहित्य में वैश्वीकरण की प्रासंगिकता'' (विशेष संदर्भ - ममता कालीयाका दौड उपन्यास) 60
प्रा.डॉ.जाधव के.के.
23. स्वच्छभारतअभियानप्रभाव एवंकठिनाईयाँ 62
श्रीमतीटीनाजोशी
24. सेंद्रिय शेतीची अपरिहार्यता 69
प्रा.बी. एस. जोगदंड
25. धारकर पवार घराण्यातील उदाजीराव पवारांचे कार्य 72
प्रा.डॉ.सुनिल रजपूत
26. पंडितजवाहरलालनेहरू यांचेआलिप्ततावादी धोरणआणिपंचशीलतत्वे 74
डॉ. संतोषबाबुरावकु–हे
27. दलित स्त्री और दोहरा अभिशाप 76
डॉ. मोहनन वी टी वी
28. सामाजिकसंशोधन आणि अर्थशास्त्रीयसंशोधन पध्दती एक अभ्यास 79
डॉ.सुरेश भा.ढाके
29. 'दशावतारचरितम्' के महाकाव्यत्वमेंआचार्य क्षेमेन्द्रका पाण्डित्य' 82
महेष दत्त शर्मा
30. निराला और मुक्तिबोध का हिन्दी काव्य पर प्रभाव 86
डॉ.ढाणकीकर शोभा नारायणराव
31. महाकवीअश्वघोष लिखितमहाकाव्यातीलस्त्रीविषयकविचार 89
श्रीमती. मुदलियारशकुंतलारामन
32. भारतातील मानवी हक्क 92
प्रा.डॉ. धुमाळे धोंडीराम कामाजी
33. हस्त भरत कला – मार्गदर्शन आणि उपयोगिता हस्त–भरतकलेचा इतिहास : 95
डॉ. एम.एन साखळकर
34. नांदेड जिल्हयातील आदिवासी लोकसंख्येचे जमातीनिहायलिंगगुणोत्तराचा भौगोलिक अभ्यास (२०११) 98
देवकर आनंदा मारोती , डॉ. एस. व्हि. ताठे

Current Global Re\ Peer Reviewed) ISSN-2319-8648
Impact Factor - (SJIF) – 7.139, ɔecial Issue –131 Aug. 2020

# भारतातील मानवी हक्क

**प्रा.डॉ. धुमाळे धोंडीराम कामाजी**

**राज्यशास्त्र विभाग प्रमुख, शिवनेरी महाविद्यालय,शिरुर अनंतपाळ**

---

भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर भारताने संसदीय लोकशाही शासन व्यवस्थेचा स्वीकार केलेला आहे. लोकशाहीत अंतिम सत्ता जनतेच्या हातात असते. लोकशाही म्हणजे लोकांचे लोकांसाठी लोकाकडून चालवले शासन होय. सरकार जनतेद्वारा निवडले जाते.खऱ्या अर्थाने सार्वभौमसत्ता लोकांच्या हाती असते. जनतेला न्याय मिळवून देण्यासाठी आणि जनतेची सेवा करण्यासाठी कायदेमंडळ, कार्यकारी मंडळ, न्याय मंडळ, निर्माण करण्यात आलेले आहे.

लोकशाहीमध्ये जनतेच्या हक्काला खूप महत्व दिले जाते व त्याचे संरक्षण केले जाते. स्वातंत्र्याच्या पूर्वीसुद्धा व्यक्तीच्या हक्काचा विचार करण्यात आलेला आहे. 20 व्या शतकात लोकमान्य टिळक यांनी स्वराज्य हा माझा जन्मसिद्ध हक्क आहे आणि तो मी मिळविणारच अशी घोषणा केली होती. ही घोषणा मानवी हक्काची होती.

1928 साली झालेल्या सर्वपक्षीय संमेलनात व नेहरु समितीच्या अहवालात मूलभूत हक्काची मागणी करण्यात आली होती. लाहोर काँग्रेसने पूर्ण स्वातंत्र्याचा ठराव 1929 ला घोषीत केला होता.

भारतीय राज्यघटनेच्या अनेक प्रकरणात मानवी हक्कांच्या संरक्षणाच्या बाबीतीत विविध तरतुदी असलेल्या दिसून येतात. भारतीय राज्यघटनेच्या उद्देशपत्रिकेत सार्वभौम, समाजवाद, धर्मनिरपेक्ष, प्रजासत्ताक, गणराज्याची घोषणा केलेली आहे. स्वातंत्र्य, समता, बंधुता व न्याय यांचा स्पष्ट उल्लेख करण्यात आलेला आहे. भारतातील सर्व नागरिकांना समान अधिकार देण्यात आलेले आहेत. सर्वांना स्वातंत्र्य बहाल करण्यात आलेले आहे. भारतात धर्म, जात, पंथ, वंश, लिंग, भाषा याद्वारे किंवा या आधारावर कोणत्याही प्रकारचा भेदभाव केला जात नाही. कायदयासमोर सर्वजण समान लेखले जातात. उदा. राष्ट्रपती ते सामान्य व्यक्ती पर्यंत आदिवाशी, अल्पसंख्यांक, मागसलेल्या लोकांच्या संरक्षणाच्या दृष्टीने विशेष तरतुदी करण्यात आलेल्या आहेत. व्यक्तीच्या आर्थिक, राजकीय, सामाजिक, शैक्षणिक विकासांच्या दृष्टीने सरकार कडून विविध धोरणे राबविली जातात. कायदयाची निर्मिती केली जाते. वरील सर्व बाबी कायदयाच्या व मानवी हक्काच्या संरक्षणाच्या दृष्टीने महत्वाच्या आहेत. असे असले तरी भारतात मानवी हक्कांचे उल्लंघन झालेले दिसून येते.

**भारतात मानवी हक्कांचे उल्लंघनः-**

मानवी हक्कांच्या संरक्षणाच्या बाबतीत भारतीय राज्यघटनेत अनेक तरतुदी करण्यात आलेल्या आहेत. तरी प्रत्यक्ष व्यवहारामध्ये वर्णभेद, वंशभेद, जातीभेद, अंधश्रद्धा, दारिद्रय, भाषावाद, गरीबी, रुढी परंपरा आणि अज्ञान अशा अनेक कारणामुळे समाजातील अनेक नागरिक मानवी हक्कांपासून वंचित राहिले आहेत. समाजातील कमजोर, दुर्बल घटकांवर फार मोठया प्रमाणात शोषण, पिळवून आणि अन्याय, अत्याचार झाले आहेत. भारतीय समाजातील अनेक दुर्बल घटकांच्या बाबतीत मानवी हक्कांचे उल्लघंन झाले आहे. याबाबीचा सविस्तर खालील प्रमाणे पाहणार आहोत.

**1. दुर्बल घटकांवर होणारा अत्याचार :-**

भारतीय समाजात विविध दुर्बल घटक पाहण्यास मिळतात. या दुर्बल घटकांत आदिवाशी, अनुसुचित जाती, अनुसुचित जमाती आणि आर्थिक दृष्टया मागासलेल्या लोकांचा यात अंतर्भाव होतो. या घटकावर फार मोठ्या प्रमाणात पिळवणूक झाली आहे. अगोदरच्या काळात भारतात ब्राम्हाण, क्षत्रिय, वैश्य व शुद्र या वर्णव्यवस्थेच्या आधारे भेदभाव केला जात होता.

शुद्राला कनिष्ठ समजले जात असे. शिक्षण, राजकीय, सामाजिक आणि धार्मिक कार्यापासून त्यांना वंचित ठेवले जात असे. शहरी व ग्रामीण भागामध्ये आजही दुर्बल घटकांवर मोठ्या प्रमाणात अन्याय होत आहे. आजही त्यांना गावात घरासाठी जागा दिला जात नाही. त्यांची घरे आजही गावाच्या बाहेर आहेत. त्यांना गावातील मंदिरात प्रवेश दिला जात नाही. समाजातील वरिष्ठ वर्गाकडून त्यांच्यावर अन्याय, अत्याचार आजही मोठ्या प्रमाणात केला जात आहे. समाजातील खालच्या दर्जाची कामे त्यांच्याकडून करुन घेतली जातात. त्यांना त्या कामाच्या प्रमाणात मोबदला दिला जात नाही. या वरील सर्व बाबीतून मानवी हक्कांचे उघड उघड उल्लंघन केले जात आहे. त्यांच्या वस्त्यामध्ये व्यवस्थीत रस्ते, गटार नाहीत. त्यांना गावातील राजकारणापासून दूर ठेवले जात आहे. त्यांच्या वरिष्ठ वर्ग विचार करत नाही. आदिवाशी आणि दलित लोकांचे घरे जाळली जातात. सामाजिक, धार्मिक कार्यात त्यांना सामावून घेतले जात नाही. त्यांचे खून केले जातात. मतदान करताना त्यांच्यावर दबाव टाकला जातो. वरील सर्व उदाहरणावरुन भारतात मानवी हक्कांचे उल्लंघन होत आहे हे दिसून येते.

2. भारतीय स्त्री हे भारतीय समाजाचा एक महत्वपूर्ण घटक आहे. स्त्री ही समाजाची अर्धी शक्ती आहे. ही सुख आणि समृद्धीचे प्रतिक मानले जाते. असे जरी असले तरी भारतात पुरुष प्रधान संस्कृती आहे. त्यामुळे स्त्रीयांवर मोठ्या प्रमाणात अत्याचार, अन्याय, शोषण व पिळवणूक होत आहे. भारतातील रुढी, परंपरा, लिंगभेद, अंधश्रद्धा याकारणामुळे स्त्रीवर मोठ्या प्रमाणात अन्याय, अत्याचार होत आहे. भारतात स्त्रीला भोगविलास वस्तू मानले जाते. त्याप्रमाणे तिच्याशी व्यवहार केला जात आहे. हजारो वर्षापासून स्त्रीयांवर होणारे अन्याय अनेक उदाहरणावरुन सांगता येतील.स्त्रीला शिक्षणापासून दूर ठेवले गेले आहे.प्राचीन भारतातील परिस्थिती याबाबतीत खूप वाईट होती. स्त्रीला शिक्षणाचा हक्क नाही, तिचे काम चूल आणि मुल यापर्यंत मर्यादीत होते. ज्ञान संपादन करणे हा स्त्रीला कलंक समजला जात होता. आजच्या तंत्रज्ञानाच्या व लोकशाहीच्या काळात अनेक स्त्रीयांना शिक्षणापासून वंचित ठेवले आहे. आजच्या काळात वाडया, तांडयावरील आणि डोंगर भागात, आदिवाशी भागात स्त्रियांचे निरक्षरतेचे प्रमाण जास्त आहे. या वरील सर्व बाबींचा विचार केल्यास मानवी हक्कांचे उल्लंघन होत असल्याचे स्पष्ट होत आहे.

प्रत्यक्ष व्यवहारात स्त्रियांना शिक्षणाप्रमाणे संपत्तीपासून दूर ठेवले जात आहे. स्त्रीला संपत्तीच्या बाबतीत पुरुषाप्रमाणे वाटा मिळत नाही. अनेक स्त्रियांना नोकरी व व्यवसायापासून दूर ठेवले जात आहे. कायदयाने बंधने असूनही भारतात आजसुद्धा बालविवाह होत आहेत. यात मुलीला विचारले जात नाही. विवाह करताना मुलाला विचारुन विवाह केला जातो. मुलीला आवड, निवड या बाबतीत काहीही बोलू दिले जात नाही. आई वडीलांच्या इच्छेनुसार मुलीला विवाह करावा लागत आहे. यामुळे भारतात आजही मानवी हक्कांचे मोठ्या प्रमाणात उल्लंघन होत आहे.

भारतात फार प्राचीन काळापासून हुंडापद्धती आहे. हा एक समाजाला लागलेला कलंक आहे. वधुपित्याकडून वरपित्याला पैसा, सोने दिली जातात. लग्न झाल्यानंतर मुलीच्या वडिलाकडून वेगवेगळया मागण्या केल्या जातात. त्या नाही मिळाल्यास मुलीला त्रास व छळ केला जातो. या सर्व बाबीला कंटाळून स्त्रिया आत्महत्या करतात. स्त्रियांचा छळ करणे हे मानवी हक्कांच्या विरुद्ध आहे.

Current Global Reviewer (Peer Reviewed) ISSN- 2319-8648
Impact Factor - (SJIF) – 7.139, Special Issue –131 Aug. 2020

भारतीय कुटूंबात मुलीपेक्षा मुलाला श्रेष्ठ दर्जा आहे. मुलाला वंशाचा दिवा म्हटले जाते. मुलगी होऊ नये म्हणून अनेक देवाला नवस केले जातात. बाळ जन्माला येण्याच्या अगोदर ते मुलगा आहे की, मुलगी आहे हे कळण्यासाठी गर्भजल परीक्षा केली जाते. गर्भामध्ये मुलगी आहे असे कळल्यास गर्भपात केला जातो. जन्म घेण्याचा अगोदरच मुलीची हत्या करण्यात येते. हे मानवी हक्कांचे स्पष्ट उल्लंघन आहे.

**संदर्भसूची**


1. मानवी अधिकार- डॉ.जय जय राम उपाध्याय.
2. भारतीय दलित और मानवाधिकार जातीवाद और संवैधानिक संरचना- डॉ. कृष्ण कुमार
3. मानव अधिकार- स्रोत ग्रंथ- अनुवाद- आदित्य नारायण सिंह
4. भारतीय राज्यघटना : प्रत्येक भारतीय नागरिकांचा धर्मग्रंथ- प्रविण टेंभेकर